# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

जा.क्र.साप्रवि/निवडणुक/पदविधर/ २३३३ /२०१६
दिनांकः- २४-१०-२०१६

प्रती,

.................................................................

.................................................................

.................................................................

विषयः- अमरावती विभाग पदविधर मतदारसंघ नोंदणी कार्यक्रम - २०१६ अकोला जिल्हयातील शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील पात्र पदविधरांच्या नोंदणीबाबत.

संदर्भः- जिल्हाधिकारी, जिल्हा निवडणुक अधिकारी यांचे दालनात दि. २२/१०/२०१६ रोजी घेण्यात आलेली सभा.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयातील पात्र पदविधर अधिकारी/ कर्मचारी यांची पदविधर मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट होण्याचे दृष्टिकोनातुन दिनांक २२/१०/२०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन कार्यालयामध्ये सभा आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी आपल्या कार्यालयातील विभाग प्रमुख यांना त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांची नोंदणी करण्याबाबत निर्देश दिलेत. तसेच याकरीता आपल्या विभागामध्ये दर्शनी भागावर कॅम्प लावुन त्यांची नोदणी करून घेण्यात यावी. याची सर्व जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची राहील. तसेच सदर कॅम्प हा दि. २४/१०/२०१६ ते २६/१०/२०१६ या दरम्यान लावण्यात यावा व सदर माहिती ही परस्पर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये विशेष दुतामार्फत पाठविण्यात यावी. तसेच जमा करण्यात आलेल्या यादीची सत्यप्रत या कार्यालयास सादर करावी.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला